**बाहेरील राज्यातून फार्मसीची शैक्षणिक अर्हताप्राप्त व्यक्तींच्या महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडे पंजीकरणासाठी दिनांक २१.०२.२०१९ पासून ठरविण्यात आलेली कार्यपध्दती**

दिनांक २० जानेवारी,२०१९ रोजीच्या वृत्तपत्रातील बातमी प्रसिध्द झाली की, ठाणे क्राईम ब्रान्च यांच्याकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळविणा-या चार फार्मासिस्टना अटक करण्यात आली आहे. सदर फार्मासिस्टनी दहावी व बारावीची नकली सर्टिफिकेट मिळवून त्या आधारे फार्मसी डिप्लोमा प्राप्त करुन घेतला व त्यानंतर महाराष्ट्र राज्य औषध व्ययवसाय परिषदेकडून रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट प्राप्त करुन औषध दुकानाचा परवाना अन्न व औषध प्रशासनाकडून मिळवला असा त्यांचेवर आरोप आहे. याबाबत पुढील तपासासाठी ठाणे क्राईम ब्रान्च यांस परिषदेकडून पूर्ण सहकार्य करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेची पंजीकरण कार्यपध्दती, कायद्यानुसार महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडे असलेले अधिकार तसेच भारतीय औषध व्यवसाय परिषदेचे अधिकार याविषयीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

- महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून फार्मसी ऍक्ट १९४८च्या (औषध व्यवसाय अधिनियम १९४८) या केंद्रीय कायद्याच्या कलम १२ अंतर्गत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली (PCI)/केंद्रीय परिषद यांनी मान्यता दिलेल्या फार्मसी पदविका, पदवी व फार्म डी. अर्हताधारक अर्जदारांना सदर कायद्याच्या कलम ३२(२) अंतर्गत तरतुदीनुसार फार्मासिस्ट नोंदणी प्रमाणपत्र जारी करण्यात येते. औषध व्यवसाय अधिनियम १९४८चे कलम ३२(२) नुसार एज्युकेशन रेग्युलेशन किंवा कलम ११ राज्यात लागू झाल्यापासून, एखाद्या व्यक्तीने विहित शुल्क भरून अर्ज केल्यास व त्याच्या वयाची अठरा वर्षे पूर्ण असतील , जर तो या राज्याचा रहिवासी असेल किंवा या राज्यात औषध व्यवसाय करत असेल, जर त्याने मान्यताप्राप्त फार्मसी शैक्षणिक अर्हता मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून उत्तीर्ण केली असेल (किंवा तो अन्य राज्यातील पंजीकृत औषध व्यवसायी असेल) तर त्याचे नांव पंजीकृत औषध व्यवसायींच्या नोंदवहीत नोंदले जाण्याचा हक्क त्याला प्राप्त होईल.
- परिषदेकडे पंजीकरणाकरीता अर्ज करण्याकरीता फार्मसी ऍक्ट १९४८च्या कलम १२ नुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली कडून मान्यताप्राप्त महाविद्यालयामधून फार्मसी पदविका/पदवी/फार्म.डी. उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. म्हणजेच भारतातील सर्व फार्मसी पदविका/पदवी/फार्म.डी. महाविद्यालयांना मान्यता देणे हे भारतीय औषध व्यवसाय परिषदेचे कार्यक्षेत्र आहे. औषध व्यवसाय अधिनियम,१९४८ च्या कलम १० नुसार भारतात औषध व्यवसायी म्हणून अर्ह होण्यास आवश्यक असलेला शिक्षणाचा किमान दर्जा विहित करणारे " शिक्षणविषयक विनियम" तयार करणे, त्याची सर्व राज्यात अंमलबजावणी करणे, फार्मसी अभ्यासक्रम ठरविणे, परिक्षा नियंत्रक यांस मान्यता, फार्मसी अभ्यासक्रम प्रवेश पात्रता, महाविद्यालय मान्यता, महाविद्यालयांवर कारवाई घेणे हे सर्व अधिकार पूर्णपणे फक्त केंद्रीय परिषदेस म्हणजेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली (PCI) आहेत. तसेच फार्मसी व्यवसाय अधिनियम १९४८च्या तरतुदीनुसार राज्य परिषदेस फक्त फार्मासिस्ट पंजीकरण देणे व पंजीकृत औषध व्यवसायीकडून गैरवर्तन झाल्यास त्याचेवर कारवाई करण्याचे अधिकार आहेत.
- तसेच एज्युकेशन रेग्युलेशन, १९९१ च्या प्रकरण २ मध्ये फार्मसी पदविका अभ्यासक्रमास प्रवेश मिळण्यासाठी किमान शैक्षणिक अर्हता उद्धृत केली आहे. सदर एज्युकेशन रेग्युलेशन, १९९१ भारतीय औषध व्यवसाय परिषदेने तयार केले आहेत व ते भारतातील सर्व राज्यांमध्ये लागू केले आहेत. त्याची अंमलबजावणी व अनुपालन करणे हे प्रत्येक फार्मसी महाविद्यालयाचे कर्तव्य आहे.
- फार्मसी ऍक्ट १९४८च्या कलम १६ अंतर्गत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली (PCI) यांच्याकडून नियुक्त इन्स्पेक्टर्स कडून मान्यताप्राप्त अभ्यासक्रम चालविणा-या संस्था व परिक्षा यांची तपासणी करणे या बाबी अंतर्भूत असून याबाबतचे कोणतेही अधिकार राज्य औषध व्यवसाय परिषदेस नाहीत.
- परिषदेतर्फे परराज्यातून शैक्षणिक अर्हता पूर्ण करणा-या अथवा परराज्यातील पंजीकृत औषध व्यवसायी असल्यास खालील कार्यपध्दती राबविली जाते:-

परराज्यातील अर्हताप्राप्त अर्जदार समक्ष कार्यालयात हजर राहून फार्मसी ऍक्ट १९४८च्या कलम ३२(२) ची पूर्तता करणारा अर्ज सादर करतात. कार्यालयाकडून सदर अर्जाची व सहपत्रांची छाननी केली जाते व मूळ कागदपत्रे "submitted" चा शिक्का मारुन परत केले जातात. एसएससी पासिंग सर्टीफिकेट हे फक्त जन्मतारखेचा पुरावा म्हणून घेतला जात असल्यामुळे त्याची स्वतंत्र पडताळणी केली जात नाही. तसेच बारावीची शैक्षणिक अर्हता एज्युकेशन रेग्युलेशन, १९९१ नुसार Admission to Diploma in pharmacy असून फार्मसी महाविद्यालयाकडून अर्जदारास प्रवेश देतेवेळी योग्य त्या निकषांची पूर्तता केल्याचे गृहित धरुन सदरहू परिषदेकडून त्याची पडताळणी केली जात नाही. त्यानंतर अतिरिक्त खबरदारी म्हणून अर्जदाराने परराज्यातून फार्मसी शैक्षणिक अर्हता प्राप्त केली असल्यास संबंधित फार्मसी महाविद्यालय / विद्यापीठ यांचेकडून अर्जदाराने अभ्यासक्रम पूर्ण करून परिक्षा उत्तीर्ण केली असल्याबाबत खातरजमा करण्यासाठी पत्र पाठविले जाते. **तसे सकारात्मक पत्र प्राप्त झाल्यानंतरच संबंधित अर्जदारास पंजीकरण दिले जाते.** त्याचप्रमाणे परराज्यात नोंदणीकृत औषध व्यवसायीनी महाराष्ट्रात पंजीकरण स्थानांतरण करून मिळावे यासाठी अर्ज केल्यास संबंधित राज्य परिषदेकडे ना हरकत प्रमाणपत्राकरीता (N.O.C.) पत्रव्यवहार केला जातो. संबंधित राज्य परिषदेने त्यांचेकडील पंजीकरण रद्द करून ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास संबंधित अर्जदारास महाराष्ट्रात पंजीकरण दिले जाते.

- परप्रांतातून उत्तीर्ण फार्मसी विद्यार्थ्यांना पंजीकरण देण्यापूर्वी फार्मसीविषयक ज्ञानाचे मूल्यमापन करण्यासाठी यापूर्वी सदर परिषदेतर्फे जुजबी चाचणी परिक्षा घेण्यात येत होती. यास मान्यता मिळण्यासाठी सदर परिषदेने राज्य शासनाकडे परप्रांतातून उत्तीर्ण फार्मसी विद्यार्थ्यांची गुणवत्ता राखण्यासाठी पंजीकरणापूर्वी चाचणी परिक्षा सुरू करण्यासाठी पत्रव्यवहार केला असता त्यांनी अशी परवानगी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली/केंद्रीय परिषदेकडून घ्यावी असे कळविले. त्यानंतर फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली/केन्द्रीय परिषदेकडे योग्य ती पार्श्वभूमी विषद करुन विविध पत्रव्यवहार करण्यात आला. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली/ केंद्रीय परिषदेकडून तद्नंतर प्रथम असे कळविण्यात आले की, राज्य परिषदेने चाचणी परिक्षा घेण्याबाबत औषध व्यवसाय अधिनियम (फार्मसी कायदा) मौन आहे. तथापि कालांतराने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली/केंद्रीय परिषदेने पत्राद्वारे कळविले की, जर उमेदवार औषध व्यवसाय अधिनियम १९४८च्या कलम ३२(२)ची पूर्तता करीत असेल तर राज्य औषध व्यवसाय परिषदेने त्यांना पंजीकरण देणे बंधनकारक आहे व त्यासाठी त्याने कोणत्याही राज्य औषध व्यवसाय परिषदेतर्फे घेण्यात येणारी चाचणी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक नाही. यामुळे या कार्यालयाने परप्रांतातील फार्मसी उमेदवारांच्या फार्मसी विषयक ज्ञानाचे मूल्यमापन थांबविले.
- **तरी देखील अतिरिक्त खबरदारी म्हणून पंजीकरणासाठी परप्रांतातून येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराच्या फार्मसी शैक्षणिक अर्हतेची त्याच्या महाविद्यालयाकडून व जर तो संबंधित राज्यातील पंजिकृत औषध व्यवसायी असेल तर संबंधित राज्य परिषद यांच्याकडून सत्यता पडताळणी करण्यात येते.** त्यांच्याकडून सकारात्मक पुष्टी देणारे पत्र प्राप्त झाल्यानंतर पंजीकरण क्रमांक दिला जातो. अशा पडताळणी प्रक्रियेत सादर कागदपत्रे बनावट असल्याचे आढळल्यास संबंधिताविरुध्द गुन्हा दाखल केला जातो. **परिषदेने आतापर्यन्त ११ गुन्हे दाखल केले आहेत.** तसेच काही प्रकरणांमध्ये संबंधित राज्याच्या मुख्यसचिवाच्या निदर्शनासदेखील ही बाब आणून दिली आहे.
- त्यानंतर देखील परराज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या उमेदवारांच्या फार्मसी विषयक ज्ञानातील त्रूटींबाबत व प्राप्त माहितीनुसार महाविद्यालयीन स्तरावर कायद्यातील तरतूदींच्या अंमलबजावणीमध्ये संभाव्य त्रुटींबद्दल फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली/ केंद्रीय परिषदेस या कार्यालयाने वेळोवेळी पत्रव्यवहार केला परंतू त्याबाबत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली/केंद्रीय परिषदेकडून काहीही पत्रव्यवहार प्राप्त झालेला नाही.
- तसेच फार्मसी महाविद्यालयाकडून भारतीय औषध व्यवसाय परिषदेच्या संकेतस्थळावर upload केलेली विद्यार्थ्यांची यादी पडताळणीसाठी राज्य औषध व्यवसाय परिषदांना login ID व password उपलब्ध करुन द्यावेत जेणेकरुन पडताळणीस पुष्टी मिळेल अशा आशयाचे पत्र भारतीय औषध व्यवसाय परिषदेस पाठवले आहे. त्यावर अद्याप उत्तर प्राप्त झालेले नाही.

ठाणे क्राईम ब्रान्च यांच्याकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळविणा-या चार फार्मासिस्टना अटक करण्यात आली आहे. सदर चार फार्मासिस्टनी औषध व्यवसाय अधिनियम,१०४८ च्या कलम ३२(२) ची पूर्तता करणारी कागदपत्रे सादर केल्यानंतर त्या उमेदवाराच्या डी. फार्मसी शैक्षणिक अर्हतेच्या पडताळणीकरीता सदरहू परिषदेकडून संबंधित फार्मसी महाविद्यालयास/विद्यापीठास पत्र पाठविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर महाविद्यालयाकडून/विद्यापीठाकडून डी.फार्म.उत्तीर्ण केल्याबाबत सकारात्मक पत्र प्राप्त झाल्यानंतरच त्यांना पंजीकरण क्रमांक देण्यात आला व त्यानंतर पंजीकरण दाखला पाठविण्यात आला.

आजपर्यन्त या कार्यालयाकडून पंजीकरणाबाबत करण्यात आलेली कार्यवाही ही सद्हेतूने आणि महाराष्ट्रात फार्मसी व्यवसायाची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे. अनेकदा लोक प्रतिनिधींकडून सदरहू उमेदवार फार्मसी कायद्याचे (Pharmacy Act,1948) निकष पूर्ण करीत असतील तर नियमोचित मदत करण्याची शिफारस होते. तसेच काही वेळेस संबंधित उमेदवाराना पंजीकरण अर्ज दाखल करण्यात किंवा तत्सम प्रक्रियेत काहीही अडसर जाणवल्यास त्याचे पर्यवसान वैयक्तिक किंवा खोट्या तक्रारीत होत असल्याचा काही वेळेस अनुभव येतो.

दिनांक ८ फेब्रुवारी,२०१९ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या बैठकीमध्ये ठाणे क्राईम ब्रान्च यांच्याकडून दाखल झालेल्या गुन्हयामधील आरोपी फार्मासिस्ट याबाबत विस्तृत चर्चा झाली. तसेच वृत्तपत्रातील बातमीचा संदर्भ घेऊन उपरोक्त चार पंजिकृत औषध व्यवसायींची नांवे औषध व्यवसाय अधिनियम,१९४८ च्या कलम ३६ अंतर्गत तरतुदीनुसार व फार्मसी प्रॅक्टीस रेग्युलेशन्स,२०१५ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या नोंदवहीतून काढून टाकण्याची कारवाई सुरु करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या घटनांमुळे परिषदेतर्फे सर्वतोपरी प्रयत्न करुन देखील परिषदेची प्रतिमा मलिन होत आहे व अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. **तसेच राज्यात फार्मसी व्यवसायाची गुणवत्ता राखण्यासाठी सदरहू बैठकीमध्ये बाहेरील राज्यातून फार्मसी पदविका/पदवी/फार्म.डी.उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या पंजीकरणासाठी खालील प्रक्रिया अवलंबिणेबाबत ठराव पारित झाला आहे व त्यानुसार यापुढे परिषदेकडून कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी** :-

<u>बाहेरील राज्यातून फार्मसी पदविका उत्तीर्ण अर्जदार खालील मूळ कागदपत्रे घेऊन कार्यालयात अर्ज समक्ष सादर करतील :-</u>

- पहिल्या व अंतिम वर्षाच्या डी.फार्मसीच्या मूळ गुणपत्रिका व छायाप्रत
- मूळ डिप्लोमा इन फार्मसी सर्टिफिकेट व छायाप्रत
- डिप्लोमा फार्मसी कॉलेज लिव्हिंग किंवा ट्रान्सफर सर्टिफिकेट किंवा मायग्रेशन सर्टिफिकेट व छायाप्रत
- एज्यु. रेग्युलेशननुसार ५०० तासांचे प्रॅक्टीकल ट्रेनिंग पूर्ण केल्याचा फॉर्म (original)
- चार पासपोर्ट साईज अलिकडील फोटो
- महाराष्ट्र राज्यात वास्तव्याचा दाखला
- ओळख स्लीप (साक्षांकित केलेली)
- परराज्यातील शैक्षणिक अर्हता असल्याने शैक्षणिक अर्हता व इतर बाबी सत्यतेवर कथन करणारे नोटराईज्ड शपथपत्र (रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर)

बाहेरील राज्यातून फार्मसी पदवी व फार्म.डी. उत्तीर्ण अर्जदार खालील मूळ कागदपत्रे घेऊन कार्यालयात अर्ज समक्ष सादर करतील:-

- अंतिम वर्षाची गुणपत्रिका
- कॉलेज लिव्हिंग सर्टिफिकेट
- कन्व्होकेशन सर्टिफिकेट
- चार पासपोर्ट साईज अलिकडील फोटो
- महाराष्ट्र राज्यात वास्तव्याचा दाखला
- ओळख स्लीप (साक्षांकित केलेली)
- परराज्यातील शैक्षणिक अर्हता असल्याने शैक्षणिक अर्हता व इतर बाबी सत्यतेवर कथन करणारे नोटराईज्ड शपथपत्र (रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर)

या व्यतिरिक्त अर्जदारांनी खालील बाबींची पूर्तता करावी :-

१) जन्मतारखेचा पुरावा यासाठी अर्जदार डोमीसाईल सर्टिफिकेट, जन्म दाखला,पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना इ. कागदपत्रं सादर करु शकतात.

२) (अ) बाहेरील राज्यातून फार्मसी कोर्स उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी शक्यतो संबंधित राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून पंजीकरण प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व नंतर पंजीकरणाच्या स्थानांतरणासाठी अर्ज करावा.

(ब) फार्मसी शिक्षण ज्या शहर/गावातून घेतले आहे तेथील स्थानिक पोलिस स्टेशनमधून अर्जदाराच्या चांगल्या वर्तणूकीचा दाखला (कॅरेक्टर सर्टिफिकेट) (नमुना सोबत जोडला आहे)

३) परराज्यातील राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून पंजीकरण शक्य नसेल तर खालील कागदपत्रे सादर करावीत :-

अ) संबंधित राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून फार्मसी कोर्स पंजीकरणास पात्र असल्याबाबतचे अर्हता पत्र (Eligibility letter) (निबंधकांकडून निर्गमित) (नमुना सोबत जोडला आहे)

ब) फार्मसी शिक्षण ज्या बाहेरील राज्यातील शहर/गावातून घेतले आहे तेथील स्थानिक पोलिस स्टेशनमधून अर्जदाराच्या चांगल्या वर्तणूकीचा दाखला (कॅरेक्टर सर्टिफिकेट) (नमुना सोबत जोडला आहे)

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून खालील बाबींची पूर्तता होईल असे पहावे :-

४) बाहेरील राज्यातील संबंधित फार्मसी महाविद्यालयाकडून पडताळणी प्रक्रियेमध्ये ‘ सदरहू विद्यार्थी त्या महाविद्यालयामधून उत्तीर्ण झाला आहे ’ असा फक्त शेरा असलेले पत्र वैध समजू नये तर एकूण चार मुद्यांचे (जसे महाविद्यालयाने प्रवेश देतेवेळी प्रवेशासाठी योग्य ती अर्हता तपासून व मान्यताप्राप्त प्रवेशक्षमतेमध्येच प्रवेश दिला आहे, प्रवेशाचे वर्ष हे भारतीय औषध व्यवसाय परिषदेकडून मान्यताप्राप्त आहे किंवा कसे) समर्थन संबंधित महाविद्यालयाकडून प्राप्त होणे आवश्यक आहे.

५) भारतीय औषध व्यवसाय परिषदेच्या संकेतस्थळावर प्रत्येक महाविद्यालयाकडून upload केलेली विद्यार्थ्यांची यादी पडताळणीसाठी login ID व password उपलब्ध करुन देणेबाबत भारतीय औषध व्यवसाय परिषदेकडे त्वरीत पाठपुरावा करावा व लवकरात लवकर login ID व password देण्याची विनंती करावी जेणेकरुन अर्ज सादर करताना त्याची पडताळणी करुन अर्ज सादर होईल.

६) ओ.पी.जे.एस. विद्यापीठ, राजस्थान व सनराईज विद्यापीठ, राजस्थान यांच्या अंतर्गत असलेल्या फार्मसी महाविद्यालयांमधील अर्जदाराकडून प्राप्त अर्ज सध्या स्थगित ठेवण्यात यावे व यापुढे सदरहू संस्थेमधून उत्तीर्ण अर्जदारांचे अर्ज परिषदेकडून पुढील सूचना मिळेपर्यन्त स्विकारु नयेत.

७) तसेच भारतीय औषध व्यवसाय परिषदेकडून लवकरच पंजीकरणापूर्वी डी.फार्म.अर्जदारांसाठी Exit Examination सुरु होत आहे. ती सुरु होईपर्यन्त बाहेरील राज्यातून फार्मसी पदविका उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या फार्मसी ज्ञानाची पडताळणी करण्याकरीता दिनांक २१ फेब्रुवारी,२०१९ पासून पंजीकरणपूर्व चाचणी परीक्षा (Evaluation Test based on multiple choice questions)सुरु करावी.

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद व भारतीय औषध व्यवसाय परिषद हया दोन्ही औषध व्यवसाय अधिनियम,१९४८ (Pharmacy Act,1948) अंतर्गत घटित झालेल्या स्वायत्त संस्था असून फार्मसी ॲक्ट च्या कक्षेत व संविधानाच्या तरतूदीचा आदर राखीत आपले कामकाज करतात. वरील प्रक्रिया ही फार्मासिस्ट हा आरोग्य सेवेतील महत्वाचा दुवा असून जनतेच्या आरोग्यात त्याची महत्वपूर्ण भूमिका असल्यामुळे तसेच यामध्ये कोणतीही प्रांतीयवादी भूमिका नसून राज्यात फार्मसी व्यवसायाची गुणवत्ता राखण्याच्या सद्हेतूने सुरु केली आहे. यामध्ये वेळोवळी बदल करण्याचे अधिकार पूर्ण परिषदेस आहेत.

सायली स्वप्नील मसाल<br>
निबंधक<br>
महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

विजय पांडुरंग पाटील<br>
अध्यक्ष<br>
महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

ठिकाण :- मुलुंड,मुंबई

तारीख :- १२.०२.२०१९

FORMAT

To be Certified from Respected Police authority with rank not less than Police inspector

To, Date-

The Registrar,

Maharashtra State Pharmacy Council, Mulund west

Mumbai -400080

Sub: Police clearance

Dear Sir/Madam

It is to certify that Mr. ---------------------------------------------------------- (name of applicant) was bona fide student of ------------------------------------------------------------------------------(name of pharmacy institute) which comes under jurisdiction of this police station ,during --------------------- to ---------------------- (period of study of D Pharm/B.Pharm./Pharm.D.).

During the said period, there are no adverse antecedents regarding said applicant.

This is for your information

Thanking you,

| Passport size recent photograph of applicant duly attested by police authority with round seal) |
|---|

(Signature and Stamp of authorized officer not below rank of Police Inspector)

<u>FORMAT</u>

<u>ELIGIBILTY LETTER from State Pharmacy Council from where Applicant passed his pharmacy course (D Pharm/B.Pharm./Pharm.D.) on the letter head of State Pharmacy Council</u>

To, Date-
The Registrar,
Maharashtra State Pharmacy Council ,
Mulund west
Mumbai -400080

Dear Sir/Madam

It is seen from documents produced by -----------------------------------------------------------------(name of applicant) that he/she has completed Pharmacy course (D.Pharm/B.Pharm./Pharm.D.) from ----------------------------------------------------------------------------(name of pharmacy institute) during ---------------------- to ----------------------- (period of study of pharmacy course D.Pharm/B.Pharm./Pharm.D.) which is approved by Pharmacy Council of India ,New Delhi under section 12 of Pharmacy Act -1948 for the purpose of registration

Thus, said applicant is eligible for registration under provisions of Pharmacy Act -1948 but as he/she is not residing or practicing the profession in this state this council has not granted any Registration number to said candidate.

This is for your information

Thanking you,

Registrar

-------------- State Pharmacy Council

(Signature and Stamp)